# प्रस्तावना

शिवचरित्राचे महत्त्व समजण्यासाठी जसा शिवपूर्वकाल समजून घेणे आवश्यक आहे, त्याप्रमाणे कृष्ण चरित्राचे व्यवस्थित आकलन होण्यासाठी कृष्णजन्मापूर्वीची यादवांची स्थिती समजून घेणे आपल्यासाठी आवश्यक ठरते. असे म्हटले जाते की, महाभारत घडले नसते, तर 'असा' कृष्ण घडला नसता. पण महाभारत घडविण्यासाठी आणि हितोपदेश देण्यासाठी आवश्यक असणारा कृष्ण घडायला सुरुवात झाली ती प्रथम वृंदावनात व नंतर मथुरेत. येथून उभा राहिला तो समस्त यादवांचा नेता, त्यांच्या संकटाचे निवारण करणारा आणि त्यांचं आयुष्य समृद्ध करणारा देखील.

श्रीकृष्णाला एकदा का आपण दैवी अवतार मानले, की आपली तर्कवादाची चौकट नाहीशीच होते. भगवान असलेला श्रीकृष्ण कोणतीही गोष्ट चमत्काराने घडवतो. भौतिक नियमांच्या चौकटीत हे बसते का? याचाही विचार करणे आपण सोडून देतो; आणि मग मानवी रूपातील एक व्यक्ती म्हणून श्री कृष्ण-चरित्राची भव्यता आपण गमावून बसतो.

श्रीकृष्णाने आपल्या आयुष्यात अनेक अचाट अविश्वासार्ह कार्ये केली. त्याचाच अंश आपल्याला शिवरायांच्या चरित्रात देखील दिसतो. मात्र शिवचरित्र केवळ चारशे वर्षांपूर्वीचे असल्याने आपण त्याला चमत्कारांचे कोंदण जडवीत नाही व त्यांना भगवंत 'बनवत' नाही. मधल्या काळात आलेल्या मुघल व ब्रिटिश राजवटींनी तर हा देदिप्यमान इतिहास झाकण्याचंच काम केले व त्यामुळेही भोळ्या-भाबड्या भारतीय मनाला त्यांना देवत्व देता आले नाही. राजाराम महाराजांनी तर सिंधुदुर्ग किल्ल्यावर त्यांचं मंदिर बांधलेलेच होते. त्यांच्या आयुष्यातील बऱ्याच घटना, जसे अफजलखानाचा वध, पन्हाळ्याहून सुटका, शाहिस्तेखानाची बोटे छाटणे

यांना चमत्कार मानले गेले असते! त्यानंतरचे चमत्कार तर त्याहून मोठे ठरण्यासारखे होते. मिर्झाराजांबरोबर करावा लागलेला तह ही तर सपशेल माघार होती, म्हणजेच हा तह कृष्णाला जरासंधाच्या स्वारीने कराव्या लागणाऱ्या पलायनासारखाच होता आणि त्यानंतरचे महाराजांचे आग्र्याला औरंगजेबाच्या कैदेत असताना निसटणे म्हणजेच ते अदृश्य झाले अशीच कल्पना केली गेली असती व ते धोकादायक प्रवास न करताच सरळ रायगडावर प्रकटले असते!

श्रीकृष्ण चरित्राचे मात्र तसे नाही. ते सुमारे ५००० वर्षांपूर्वी घडले असावे अशी सर्वमान्यता आहे. हरिवंशानंतर इतर पुराणकथा, कीर्तने, भजने यातून ते जागविले गेले. त्याचमुळे ते कोणत्याही प्रकारची लेखन सामुग्री नसताना केवळ मौखिक परंपरेने टिकून राहिले. आणि म्हणून श्रीकृष्णाच्या पराक्रमाचे रूपांतर चमत्कारांमध्ये झाले व त्याचे असामान्य कर्तृत्व देवपणाच्या वलयाने झाकोळले. त्यामुळे या दोन महापुरुषांच्या जीवनात डोकावताना आपल्याला त्यांच्या जन्मापूर्वीची परिस्थिती विचारात घ्यावी लागते.

कृष्ण चरित्रात कुणाला काय सापडेल हे सांगणं कठीण आहे. भक्तांना भक्तवत्सल कृष्ण, गोपिकांना प्रेम-मूर्ती कृष्ण, अभ्यासकांना तत्त्वज्ञ कृष्ण, तर धुरंधरांना राजकारण निपुण कृष्ण, असा तो एकाच व्यक्तीच्या ठाई सापडतो आणि तो देखील प्रचंड उच्च पातळीवरचा; इतका की, विंटरनिट्झ सारख्या पाश्चात्त्य अभ्यासकांना व काही भारतीय अभ्यासकांना देखील या तीन वेगवेगळ्या व्यक्ती वाटतात. गोकुळातील कृष्ण वेगळा, महाभारतातील पांडवसखा कृष्ण वेगळा व गीता सांगणारा रणांगणावरील कृष्ण वेगळा! आहे की नाही गंमत....

कोरोना काळात उपलब्ध असलेल्या मोकळ्या वेळात मी महाभारताचा अभ्यास सुरू केला. इतकी वर्ष मी महाभारत वाचलं होतं ते गोष्टीरूपातलं,

पण काही वर्षांपूर्वी श्री. एस एल भैरप्पांची ‘पर्व’ ही महाभारतावर आधारित कादंबरी हातात पडली व महाभारताकडे बघायचा माझा दृष्टिकोन बदलूनच गेला. त्यातील तर्कशास्त्र बुद्धीला पटू लागलं व महाभारताचा अभ्यास वेगळ्या मानवी दृष्टिकोनातून सुरू झाला. त्यासाठी मग महाभारताची मूळ प्रचलित मराठी आवृत्ती, संस्कृत-हिंदी  आवृत्ती मिळवली, बरंचसं टीकात्मक लेखन वाचून काढलं. यात इरावती कर्वेंचं ‘युगांत’, दुर्गा भागवतांचे ‘व्यासपर्व’, आनंद साधलेंचं ‘हा जय नावाचा इतिहास आहे’, शं.के.पेंडसेंचं ‘महाभारतातील व्यक्तिदर्शन’, दांडेकरांचं ‘धर्मक्षेत्रे कुरूक्षेत्रे’, नरहर कुरुंदकरांचं ‘व्यासांचे शिल्पं’ अशा प्रकारची मिळतील ती पुस्तकं, लेख, संकलने वाचून काढली.या दिग्गजांनी महाभारताचा अशा प्रकारे अभ्यास पन्नासेक वर्षांपूर्वीच केलेला आहे, आता बराच कालावधी लोटल्यामुळे तो काळाआड गेलाय इतकंच.  याच अभ्यासात महाभारताबरोबरच कृष्णाचंही एक वेगळं रूप उलगडत होतं. मग मी महाभारताचे मला समजलेले रहस्य उलगडण्यासाठी ‘महाभारताचा रहस्यभेद’ या नावाचा ब्लॉग सुरू केला. याला चांगला प्रतिसाद मिळू लागला व त्यातच माझा वर्गमित्र संजय दाभोळकर याने मला कृष्णाचं मानवी रूप उलगडण्याची विनंती केली आणि मी कृष्णाच्या वेगळ्या अभ्यासाला प्रारंभ केला.

कृष्ण महाभारतात येतो तोच द्रौपदी स्वयंवरात, तेही एक आमंत्रित प्रेक्षक म्हणून. मग त्याने स्वयंवरात भाग का घेतला नाही? तो राजा नव्हता म्हणून? की तो क्षत्रिय नसून एक गवळी होता म्हणून? तसं असेल तर त्याला एक सन्माननीय स्थान का होतं? या स्थानी पोहोचणाऱ्या कृष्णाचं त्यावेळी त्याचे वय काय असावे? त्याची किती लग्ने झाली होती? त्याने तिथे पांडवांना कसे ओळखले होते? असे बरेच प्रश्न संजयसाठी कृष्णाची तयारी करताना माझ्या मनात उभे राहिले. यातील काही  प्रश्नांची उत्तरं महाभारतात नव्हती, तशीच ती इतर प्रचलित कृष्णसाहित्यातून अथवा ‘युगंधर’ सारख्या कादंबरीतूनही समाधानकारकरीत्या मिळत नव्हती आणि म्हणूनंच मला या प्रश्नांची उत्तरे

मिळविण्यासाठी इतर कृष्णसाहित्याकडे वळावे लागले. यात प्रामुख्याने समावेश होता तो हरिवंशाचा. हरिवंश हे महाभारताचंच ‘जोडपर्व’ किंवा ‘खिलपर्व’ म्हणून ओळखलं जातं. यात सुमारे सोळा हजार श्लोकांतून कृष्णाचं महाभारतात आलेलं आयुष्य वगळता इतर आयुष्य आलेलं आहे. याचबरोबर बाळशास्त्री हरदास यांनी, मार्च-एप्रिल १९५२ या कालावधीमध्ये कृष्णावर दिलेल्या व्याख्यानमालेचा मी अभ्यास केला. यांचा अभ्यास केल्यावर मानवी कृष्णाला लागणारे निकष यांवर आजमावले व त्यातून ‘तयार’ झालेला कृष्ण माझा मित्र संजयला ऐकवला. त्यालाही तो भावला. संजयच्या प्रश्नांची उत्तरे देखील सापडत गेली व त्यातूनच कृष्णाख्यान या माझ्या व्याख्यानमालेची संकल्पना उदयाला आली. आपल्याला उलगडलेला एक अनोखा कृष्ण इतरांनाही सांगावा व त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांसाठी अजून अभ्यास करावा असं मी ठरवलं. आणि त्याची परिणती आज या पुस्तकात होते आहे.

## वर, शाप आणि चमत्कार

महाभारत, हरिवंश अथवा इतर भारतीय पुराणांत चमत्कार, तसेच वर आणि शापांचा बराच भरणा असतो. एका नोंदीनुसार महाभारतात संशोधित अथवा चिकित्सक आवृत्तीत देखील सुमारे अडीचशे वर आणि **दीडशे शाप** आहेत. या वर - शापातून देखील बरेचदा चमत्कारांचा जन्म होतो. कृष्णचरित्रात देखील हे आपल्याला वेळोवेळी आढळतात व त्याचं तात्पर्य समजून घेणं आपल्याला आवश्यक ठरतं.

एखाद्या पुराणकालीन घटनेची संगती लावण्याकरिता वर-शाप व चमत्काराचा वापर केला जातो. बरेचदा एखादी घटना किंवा त्यातील व्यक्तीचं महत्त्व वाढविण्यासाठी वर किंवा शाप वापरले जातात व तसेच चमत्कारही वापरले जातात. कृष्ण चरित्रातील उदाहरण द्यायचं झालं तर, यादवकुळाचा अंत

आपापसातील यादवीने झाला व त्याचबरोबर  कृष्णाचा मृत्यू एका पारध्याच्या बाणाने झाला; याचं कारण गांधारीचा शाप असं सांगितलं गेलं. यातून, एका साधारण इसमाने कृष्णाची हत्या केली, या सत्यावर या शापाचे पांघरूण घालून त्याची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

कृष्णजन्माच्या स्थितीतही चमत्कार दिसतो तो वासुदेव कृष्णाला मथुरेपार घेऊन जाताना; यमुनेने हरिचा पदस्पर्श होताच वाट करून दिली असा. मग आपल्याला प्रश्न पडतो की, भौतिकशास्त्राचे नियम बाजूला सारत हे शक्य आहे काय? आणि इतर ग्रंथांचा डोळसपणे आढावा घेतला तर आपल्याला त्याचं उत्तरही सापडतं. अशी अनेक उत्तरे आपण या '**कृष्णाख्यानात**' पाहणार आहोत.

आता इतकी प्रस्तावना झाल्यावर आपण कृष्णचरित्राकडे वळू व त्यातही प्रथम यादवांचा पूर्वेतिहास व कृष्ण जन्मापूर्वीची स्थिती जाणून घेऊ.

**लेखक - महेश गं. नाईक**
**प्रथमावृत्ती (ई आवृत्ती) – देवशयनी आषाढी एकादशी शके १९४४**
**इंग्रजी दिनांक – १० जुलै २०२२**

# Contents

१) अर्पण पत्रिका

२) ऋणनिर्देश

३) प्रस्तावना

४) प्रकरण १ - यादवांचा पूर्वेतिहास व वंशावळ

५) प्रकरण २ - कृष्ण जन्म

६) प्रकरण ३ - कृष्णाचे बालपण

७) प्रकरण ४ - लोकनेत्याचा उदय

८) प्रकरण ५ - जरासंधाच्या मथुरेवर स्वाऱ्या

९) प्रकरण ६ - कालयवनाचा वध व रुक्मिणीहरण

१०) प्रकरण ७ - स्यमंतक मण्याची कथा

११) प्रकरण ८ - श्रीकृष्णाच्या अष्टपत्नी

१२) प्रकरण ९ - द्रौपदी स्वयंवरात पांडवांशी भेट

१३) प्रकरण १० - अर्जुनाचे सुभद्राहरण व त्यातील श्रीकृष्णाची भूमिका

१४) प्रकरण ११ - खांडववन दहन व इंद्रप्रस्थाची स्थापना

१५) प्रकरण १२ - जरासंध वधाची पूर्वपीठिका

१६) प्रकरण १३ - जरासंध वध

१७) प्रकरण १४ - राजसूय यज्ञ व श्रीकृष्ण

१८) प्रकरण १५ - पांडवांवर द्यूत-प्रसंग

१९) प्रकरण १६ - द्रौपदी वस्त्रहरण प्रसंग

२०) प्रकरण १७ - युद्ध व कृष्ण

२१) प्रकरण १८ - कृष्ण-शिष्टाई

२२) प्रकरण १९ - महाभारत युद्धातील श्रीकृष्ण

२३) प्रकरण २० - युद्ध समाप्ती नंतर...

२४) प्रकरण २१ - परीक्षिताचा जन्म व पांडवांशी अखेरची भेट

२५) प्रकरण २२ - बलरामाकडून रुक्मीचा वध

२६) प्रकरण २३ - यदुकुळाचा विनाश व श्रीकृष्णाचा मृत्यू

२७) श्रीकृष्ण अभ्यासताना

२८) परिशिष्टे

२९) परिशिष्ट १ - महाभारताचे शुद्धीकरण व BORI

३०) परिशिष्ट २ - कृष्णचरित्रातील राधा

३१) परिशिष्ट ३ - पौंड्रक वासुदेवाचा वध

३२) परिशिष्ट ४ - श्रीकृष्णाचे वय

३३) परिशिष्ट ५ - श्रीकृष्णाचे सुदर्शनचक्र

३४) परिशिष्ट ६ - कृष्णसाहित्याची साधने

३५) संदर्भ साहित्य

३६) तळटीपा

३७) लेखक परिचय

३८) तळटीपा